# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे.
# उपविधी सन २०२५-२६

| अ. क्र. | सध्याचा उपविधी क्र. | नवीन उपविधी क्र. | सध्याच्या पोटनियम-नियमांची शब्दयोजना | दुरूस्ती झाल्याप्रमाणे पोटनियम-नियमांची शब्दयोजना | दुरूस्तीची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | क १.१ | क १.१ | **संस्थेचे निधी खाली दिलेल्या मार्गांनी उभारले जातील.**<br>४. सभासंदाकडुन ठेवी<br>**(अ)एस.आय.पी.ठेव योजना :-**<br>सदर ठेव दरमहा कमीत कमी ५००/- रू. प्रत्येक सभासदांकडून वसुल केली जाईल. सदर रक्कम सभासदांनी मागणी केल्यास वर्षातून एकदाच परत दिली जाईल. सदर ठेवीवरील व्याज संस्थेच्या आवर्ती ठेवीप्रमाणे राहील व प्रत्येक वर्षी ३१ मार्च अखेर त्याचे एस.आय.पी. खात्यावर जमा केले जाईल. | **संस्थेचे निधी खाली दिलेल्या मार्गांनी उभारले जातील.**<br>४. सभासंदाकडुन ठेवी<br>**(अ)एस.आय.पी.ठेव योजना :-**<br>सदर ठेव दरमहा कमीत कमी ५००/- रू. प्रत्येक सभासदांकडून वसुल केली जाईल. सदर रक्कम सभासदांनी मागणी केल्यास सभासदांच्या मागणी अर्जानुसार परत दिली जाईल. सदर ठेवीवरील व्याजदर दर साल दर शेकडा ८% प्रमाणे प्रत्येक वर्षी ३१ मार्च अखेर सभासदांचे एस.आय.पी. खात्यावर जमा केले जाईल. | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन |
| २ | फ १.१० | फ १.१० | **३) कर्जविषयक धोरण :-**<br>२. व्यवस्थापक समितीला सभासदांच्या गरजेनुसार फेर कर्ज मंजूर करता येईल. कर्ज मंजूर रकमेच्या २५ टक्के रक्कम त्याची शेअर्स व संचित ठेव मिळून संस्थेकडे जमा करावी किंवा संस्थेकडे जमा असावी. | **३) कर्जविषयक धोरण :-**<br>२. व्यवस्थापक समितीला सभासदांच्या गरजेनुसार फेर सर्वसाधारण कर्ज मंजूर करता येईल. सर्वसाधारण कर्ज मंजूर रकमेच्या २० टक्के रक्कम त्याची शेअर्स व संचित ठेव मिळून संस्थेकडे जमा करावी किंवा संस्थेकडे जमा असावी.<br><br>तसेच व्यवस्थापक समितीला सभासदांच्या गरजेनुसार गृह कर्ज व तारण कर्ज मंजूर करता येईल. कर्ज मंजूर रकमेच्या १० टक्के रक्कम त्याची शेअर्स व संचित ठेव मिळून संस्थेकडे जमा करावी किंवा संस्थेकडे जमा असावी. | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन |

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे.

# उपविधी सन २०२५-२६

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | फ १.१० | फ १.१० | **३) कर्जविषयक धोरण :-**<br><br>११. नवीन | **३) कर्जविषयक धोरण :-**<br><br>११. सर्वसाधारण कर्ज/ तारण कर्ज/ गृह कर्ज मंजूर करताना कर्ज मंजूर रक्कमेच्या ०.४५ % रक्कम मयत सभासद कर्ज माफी निधीकरीता विना परतीची कर्ज काढतेवेळी तसेच कर्ज काढल्याचे दिनांकापासून प्रत्येक पुढिल प्रत्येक वर्षी शिल्लक कर्ज रक्कमेवर ०.४५ % रक्कम मयत सभासद कर्ज माफीसाठी विना परतीची आकारण्यात येईल.<br>सदर मयत सभासद कर्ज माफी निधी विना परतीची रक्कम ही कर्ज काढणा-या प्रत्येक सभासदास बंधनकारक राहील.<br><br>सभासद मयत निधीच्या रक्कमेतून मयत सभासदांचे संस्थेतील शिल्लक सर्वसाधारण कर्ज/ तारण कर्ज/ गृह कर्ज रक्कम संपूर्ण माफ केली जाईल.<br><br>तसेच संस्थेत जमा असणारे जमा शेअर्स, संचय निधी, एस.आय.पी ठेवी, आवर्ती ठेव तसेच मुदत ठेवीतील रक्कम मयत सभासदांचे संस्थे्रच्या अभिलेखावर नोंद असणारे वारसास अदा करण्यात येईल. | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन |

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे.

# उपविधी सन २०२५-२६

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | फ<br>१.१४ | फ<br>१.१४ | **सभासद कल्याण निधी :-**<br>(ज) नवीन | **सभासद कल्याण निधी :-**<br>(ज) **"ग्रुप आरोग्य विमा"** :- संस्थेचे सभासद, नाममात्र सभासद, सभासदांचे कुटुंब (पती/ पत्नी, २ मुले) हे आजारी पडल्यास/ अपघात झाल्यास संस्था प्रत्येक सभासदाचा वैदयकीय उपचाराकरीता रक्कम रुपये २ लाख/ ३ लाख / ५ लाखापर्यंतचा ग्रुप आरोग्य विमा, विमा कंपनीच्या नियम व अटीनुसार काढणार आहे.<br><br>**"ग्रुप आरोग्य विमा"** यांची विमा पॉलिसी प्रिमियम रक्कम ही संस्थेच्या सभासद, नाममात्र सभासद यांचेकडून काही प्रमाणात प्रिमियमची रक्कम घेण्यात येईल व शिल्लक प्रिमियमची रक्कम संस्थेच्या **"सभासद कल्याण निधीतून"** विमा कंपनीस अदा करण्यात येईल.<br><br>सभासद, नाममात्र सभासद यांचेकडून घेण्यात येणा-या प्रिमियमची रक्कम ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळ राहतील. तसेच **"ग्रुप आरोग्य विमा"** प्रिमियमची रक्कम सभासदांचे वेतनातून समान १२ हप्त्यात कपात करण्यात येईल.<br><br>**"ग्रुप आरोग्य विमा"** प्रिमियम रक्कम तसेच ग्रुप आरोग्य विमा रक्कमेची मर्यादा, विमा कंपनीच्या अटि व निमानुसार कमी जास्त करण्याचा अधिकार संचालक मंडळास असेल. | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन |

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे.
# उपविधी सन २०२५-२६

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | ड १.१ | ड १.१ | **सभासदत्वासबंधी पात्रता :-**<br>**कोणत्याही व्यक्तीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २२ प्रमाणे अटींची पूर्तता केल्याशिवाय सभासद होता येणार नाही.**<br>**१. पुणे जिल्हा कार्यक्षेत्रात असणा-या पोलीस खात्यातील आस्थापनेवर खालील पोलीस कार्यालयातील कायम सेवक (असला पाहिजे).**<br><br>२३. नवीन<br><br>२४. नवीन | **सभासदत्वासबंधी पात्रता :-**<br>**कोणत्याही व्यक्तीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २२ प्रमाणे अटींची पूर्तता केल्याशिवाय सभासद होता येणार नाही.**<br>**१. पुणे जिल्हा कार्यक्षेत्रात असणा-या पोलीस खात्यातील आस्थापनेवर खालील पोलीस कार्यालयातील कायम सेवक (असला पाहिजे).**<br><br>**२३.इमिग्रेशन, पुणे**<br>(मा. पोलीस आयुक्त सो़, पुणे शहर, मा. पोलीस आयुक्त सो़, पिंपरी चिंचवड व मा. पोलीस अधिक्षक सो़, पुणे ग्रामीण या घटकातील प्रतिनियुक्तीवर असलेले सर्व अधिकारी, अंमलदार तसेच सर्व कार्यालयीन सेवक)<br><br>**२४.केंद्रिय गुप्तचर विभाग, भ्रष्टाचार विरोधी पथक, पुणे**<br>(मा. पोलीस आयुक्त सो़, पुणे शहर, मा. पोलीस आयुक्त सो़, पिंपरी चिंचवड व मा. पोलीस अधिक्षक सो़, पुणे ग्रामीण या घटकातील प्रतिनियुक्तीवर असलेले सर्व अधिकारी, अंमलदार तसेच सर्व कार्यालयीन सेवक.) | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन |

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे.
## उपविधी सन २०२५-२६

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | २५. नवीन | **२५.मा. पोलीस महानिरीक्षक सो, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे** (मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर, मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड व मा. पोलीस अधिक्षक सो, पुणे ग्रामीण या घटकातील प्रतिनियुक्तीवर असलेले सर्व अधिकारी, अंमलदार तसेच सर्व कार्यालयीन सेवक.)<br><br>(वरील दुरुस्त मुद्दे सोडून इतर मुद्दे सध्याच्या उपविधीनुसार राहतील.) | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | फ १.१० | फ १.१० | ५. **नवीन** | **५. तारण कर्ज**<br><br>१) **तारण कर्ज (अग्रिम )मंजूरीसाठी घराची किंमत मर्यादा :-** नवीन बांधावयाच्या किंवा विकत घ्यावयाच्या तयार नवीन घराची/ जुन्या घराची किंमत मर्यादा कमाल रू. ५० लाख<br><br>२) **तारण कर्ज (अग्रिमची) वसुली** :- कर्जाची /अग्रीमाची व्याजासह वसूली सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल अशारीतीने कमाल २० वर्षात करता येईल. कर्ज/अग्रिम धारक त्याच्या इच्छेनुसार कमी कालावधीत कर्ज/अग्रिम व व्याजाची रक्कम फेडण्यासाठी मासिक हप्त्याची रक्कम वाढवू शकेल.<br><br>**३) कर्ज (अग्रिमची) मंजूरीसाठी अटी :-**<br>१) तारण अग्रिम मंजूर होण्यासाठी शासनाच्या सेवेतील नियुक्तीनंतर कमीत कमी ३ वर्ष सेवा झाली पाहीजे व ऊर्वरीत सेवा कालावधी किमान ५ वर्ष शिल्लक असणे अनिवार्य आहे.<br><br>२) सेवानिवृत्तीपूर्वी वेतनातून मासिक हप्त्यात व तदनंतर उपदानातून व्याजासह परत फेडीची क्षमता असावी. | संचालक मंडळाचे सुचनेवरुन व सभासदांचे मागणीवरुन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ३) वरील सर्व प्रयोजनासाठी घेण्यात येणाऱ्या अग्रिमाकरीता घर/जमिन अर्जदाराच्या स्वतःच्या नावावर असणे आवश्यक राहील.<br><br>४) **तारण कर्ज (अग्रिम )** कोणत्याही प्रयोजनासाठी अग्रिम घेण्याकरीता **नोंदणीकृत गहाणखत** आवश्यक राहील. वैयक्तिक बंधपत्र/ जामीनखत इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता राहील.<br><br>५) सभासद तारण कर्ज (अग्रीम) मंजुर केलेल्या रकमेचा संस्थेने वेळोवेळी ठरविलेल्या धोरणानुसार विमा भरणे बंधनकारक राहील.<br><br>६) घराच्या किंमतीइतका घराचा/ कर्ज रक्कमे इतका मयत सभासद कर्ज माफी निधी संस्थेने ठरविलेल्या धोरणानुसार कपात करण्यात येईल व दरवर्षी कर्ज संपेपर्यंत कर्ज घेतलेल्या दिनांकास संस्थेच्या धोरणानुसार मयत सभासद कर्ज माफी निधी रक्कम कर्जदाराचे कर्जखाती नावे टाकून मयत सभासद कर्ज माफी निधीचे नुतणीकरण करण्यात येईल. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ७) सभासदास शासकिय सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केल्यास/ बडतर्फ केल्यास अथवा सेवेतून काढून टाकले असल्यास सक्तीने सेवानिवृत्तीच्या/बडतर्फीच्या/ सेवेतून काढून टाकल्याच्या दिनांकास त्यास देय असलेल्या शासकिय रकमांमधून, वसुल करावयाची अग्रिमची संपूर्ण रक्कम व शिल्लक व्याजाची संपूर्ण रक्कम वसूल करण्यात येईल.<br>यानंतरही सभासदांकडून अग्रिम अथवा व्याजाची रक्कम वसुल करावयाची शिल्लक राहील्यास सभासदास शिल्लक रक्कम संस्थेस तात्काळ भरणा करावी अन्यथा अशा सभासदाचे घर/ सदनिका संस्थेकडे गहाण असल्याने सदर घर/ सदनिका लिलाव करून त्या रक्कमेतून वसुल करण्यात येईल.<br><br>८) सभासदाने अग्रिम ज्या प्रयोजनासाठी मंजूर केले आहे त्या कारणासाठी त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पानल न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूरी झाल्यास सदर सभासदाकडून **कर्ज (अग्रिम )** ची रक्कम प्रचलित व्याजदर **+**२.७५ टक्के दंडनीय व्याजासह एक रकमी वसुल करण्यात येईल. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ४) **व्याजदर** :- व्याज दर ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास असतील.<br><br>५) **तारण कर्ज (अग्रिम) मंजूरीकरीता आवश्यक कागदपत्रे :-**<br>**अ) तारण कर्ज (अग्रिम) प्रयोजन – नवीन/जुने घर/ सदनिका (तयार) घेण्यासाठी तारण अग्रीमसाठी जोडावयाची कागदपत्रे**<br>१) मूळ मालकाचे विक्रीबाबत संमतीपत्र/करारनामा,<br>२) घरावर कर्जाचा बोजा नसावा/निर्विवाद हक्क असल्याचे प्रमाणपत्र/हमीपत्र,<br>३) इसारा रक्कम पावती/नोदणीकत करारनामा,<br>४) अर्हताप्राप्त वास्तु शास्त्रज्ञ किंवा स्थापत्य अभियंता यांनी तयार केलेला घराचा नकाशा व मूल्य निर्धारण प्रमाणपत्र<br>५) मालमत्ता व नोंदणी निबंधकांचा उतारा,<br>६) घरांचे बांधकाम अधिकृत असल्याबाबत ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका यांचे नाहरकत प्रमाणपत्र आणि<br>७) नोंदणीकृत सहकारी संस्थेत तारण खरेदी करावयाचे असल्यास सहकारी संस्थेचे नाहरकत प्रमाणपत्र तसेच संस्थेत संस्थेचा सभासद म्हणून घेण्यास तयार आहेत अशा आशयाचे प्रमाणपत्र वित्तीय नियम १९५९ परिशिष्ट २६ अनुसार अे-२ मध्ये करारनामा. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **ब) तारण कर्ज (अग्रिम) प्रयोजन - जागा (जमीन) खरेदी करुन त्यावर विहीत कालावधीत घर बांधणे कामी तारण कर्ज (अग्रिम) साठी जोडावयाची कागदपत्रे**<br>१) जागा मालकाचे जागा बिक्रीबाबत संमतीपत्र<br>२) जागा मालकाचा त्यावर निर्विवाद हक्क असल्याचे हमीपत्र,<br>३) इसार पावती व अर्जदार आणि जागा मालक (भूखंड मालक) यांच्यातील नोंदणीकृत करारनामा,<br>४) भूखंड बिगर शेती व विकसीत जागेबाबत पुरावा,<br>५) प्रस्तावित बांधकामाचा मंजुन नकाशा व परवानगी,<br>६) अपेक्षित खर्चाबाबत प्रमाणपत्र<br>७) आवश्यक पात्रते बाबतची सर्व कागदपत्रे.<br><br>**फ) शासनमान्य वित्तीय संस्थाकडून घरबांधणी/तयार घर/सदनिका खरेदीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी तारण कर्ज (अग्रिम) साठी जोडावयाची कागदपत्रे**<br>१) विकत घेतलेल्या/बांधलेल्या/बांधण्यात येत असलेल्या घराचा/सदनिकेचा मान्यताप्राप्त नकाशा, | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | २) घरबांधणी किंवा विकत घेण्यसाठीचे कर्ज घेतले असल्याबाबत वित्तीय संस्थेचे प्रमाणपत्र.<br>३) घेतलेले/बांधलेले तारण स्वतःच्या नावे व पुणे जिल्हयात असल्याबाबत पुरावा<br>४) किंमतीबाबत अधिकृत मुल्यांकन अधिका-यांचे प्रमाणपत्र<br>५) कर्जाची रक्कम परत फेड झालेली व शिल्लक याबाबत वित्तीय संस्थेचे पत्र<br>६) पात्रतेबाबतची आवश्यक प्रमाणपत्रे<br><br>**६) तारण कर्ज (अग्रिम) प्रदान झाल्यानंतर सादर करावी लागणारी कागदपत्रे**<br><br>**अ)तारण कर्ज (अग्रिम) प्रयोजन- नवीन/जुने घर/सदनिका (तयार) घेण्यासाठी तारण बांधणी अग्रीम तारण कर्ज (अग्रिम) प्रदान झाल्यानंतर सादर करावी लागणारी कागदपत्रे/प्रमाणपत्रे –**<br><br>१) अग्रीम घेतल्यानंतर ३ महिन्याच्या आत तारण खरेदीकरुन खरेदीखत सादर करावे लागते.<br>२) घराच्या किमतीबाबत नोंदणीकृत मुल्याकंन अधिका-याकडून मिळविलेले प्रमाणपत्र<br>३) घराची निर्विवाद मालकी कर्मचा-याचें नावे झाल्याबददल पुराव्याची कागदपत्रे. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **ब) जागा(जमीन) खरेदी करुन त्यावर विहीत कालावधीत तारण बांधणे कामी**<br>१) **तारण कर्ज (अग्रिम)** च्या पहिल्या हप्त्याची रक्कम काढल्या पासून दोन महिन्याच्या आत भूखंड खरेदी करुन खरेदीखत सादर करणे.<br>२) भूखंडाच्या खरेदीदाराच्या निर्विवाद हक्काबाबत पुरावा<br>३) भूखंड व त्यावर बांधावयाचे तारण शासनाकडे गहाण ठेवण्याबाबत प्रपत्र बी मध्ये गहाणखत करुन नोंदणी करुन सादर केल्यावरच दुस-या हप्त्याची रक्कम मंजूर केली जाते.<br>४) बांधकाम जो त्यापर्यंत पूर्ण झाल्याचे व दुस-या हप्त्याच्या रककमेचा पूर्ण विनियोगाबाबत प्रमाणपत्र दिल्यावरच तिसरा हप्ता दिला जातो.<br>५) बांधकाम छतापर्यंत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यावर ४ था हप्ता मिळतो.<br>६) पूर्ण **तारण कर्ज (अग्रिम)** चे विनियोग प्रमाणपत्र व घरनिवास योग्य प्रमाणपत्र दयावे लागते. | |